जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २१९** **दिनांक :- १६/०८/२०२१**

## जबरीने सोनसाखळी चोरी करणारे ४ आरोपी अटकेत- नऊ गुन्हे ऊघडकीस करुन ५,५२,०००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक २०/०७/२०२१ रोजी सकाळी ०८:३० वा. च्या सुमारास विरार पुर्वेकडील मनवेलपाड्याच्या मॉ जय अंबे बिल्डींगच्या बाहेरील रस्त्यावर पायी चालत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन तीच्या पाठीमागून पायी चालत आलेल्या एका अनोळखी चोरट्याने जबरीने खेचून त्याच्या साथीदारासह मोटारसायकलवरुन पळून गेल्याबाबत यातील फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ६२१/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान गुन्हयाचे घटनास्थळावरील प्राप्त पुरावे, आरोपींची गुन्हा करण्याची कार्यपध्दती आणि बातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन वसईच्या भोईदा पाड्यातून दोन संशईत सोनसाखळी चोरांना आणि त्यांच्या इतर दोन साथीदारांना फाऊंटन हॉटेल परीसरातून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासामध्ये त्यांचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली.

यातील सर्व अटक आरोपी हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर मुंबई, ठाणे व इतर पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाण्यामध्ये जबरी चोरी, घरफोडी, आर्म ॲक्ट इ. प्रकारचे गंभिर गुन्हे दाखल आहेत. नमुद गुन्ह्यातील अटक आरोपी यांची टोळी असून त्यातील सोनसाखळी चोर मोटारसायकलवरुन पायी चालणाऱ्या महिलांच्या गळ्यातील दागिने जबरीने चोरुन त्यांच्या साथीदार आरोपींकडे विल्हेवाट लावण्यासाठी देतात आणि दागिन्यांची विल्हेवाट लावून मिळालेल्या पैशांची ऐकमेकांत वाटणी करुन घेतात. सदर गुन्हयात आरोपी नामे १) रियाझ रमजान शेख वय ३६ वर्षे, रा. वाघरळ पाडा, भोयदा पाडा, वालीव, ता. वसई (पु.), जि. पालघर मुळ राहणार गाव मौजे बरदोनी, पोस्ट सोमा, पोलीस ठाणे बिठान, जि. समस्तीपूर, राज्य बिहार, २) शानु ऊर्फ समिर मोहम्मद वसीम कुरेशी, वय ३० वर्षे, रा. रुम नं के/४०१, रिलायबल टॉवर, भोईदा पाडा, वसई (पु.) मुळ राहणार बिल्डींग क्र. ११६, गाव बँगलोर मॅजेस्टीक, रेल्वे ट्रॅकच्या बाजूला, पोलीस ठाणे दोरी पालड्या, बँगलोर, राज्य कनार्टक, ३) मोहम्मद जमीर बशीर शेख, वय ५५ वर्षे, रा. रु.क्र. ०६, ऑफिस फैयाज खान चाळ, शिवाजी नगर, जोगश्वरी (पु.), मुंबई व ४) राकेश प्रेमबहादुर सिंग, वय २९ वर्षे, रा. ७०६, बिल्डींग क्र. १८/सी, संघर्षनगर, खैराणी काटा, चांदीवली अंधेरी (पु.), मुंबई अशांना अटक करण्यात आली असून तपासादरम्यान त्यांच्याकडून १) ३,१२,०००/- रुपये किंमतीचे ८० ग्रॅम वजनाच्या एकुण ०७ सोन्याच्या चैन व २) २,४०,०००/- रुपये किंमतीच्या तीन मोटारसायकल असा एकुण ५,५२,०००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून खालील ९ गुन्हे उघड करण्यात विरार पोलीस स्टेशनला यश आलेले आहे.

| अ.क्र. | गु.नों.र.क्र. |
|---|---|
| १. | **विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ६२१/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२** |
| २. | **विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ६०७/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४** |

| | |
|---|---|
| ३. | **विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ६६६/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४** |
| ४. | **विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ६६७/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४** |
| ५. | तुळींज पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ९७१/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ |
| ६. | माणिकपूर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र २६८/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ |
| ७. | माणिकपूर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र २७९/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ |
| ८. | समता नगर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ५९९/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३७९ |
| ९. | दहिसर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ९४४/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३७९ |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ३ व श्रीमती रेणुका बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक अभिजीत भुपेंद्र टेलर, संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. विजय दुबळा, हर्षद चव्हाण, भुषण वाघमारे, संदिप शेरमाळे, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, पवन पवार, सागर घुगरकर यांनी केली आहे.

*********